अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - १८६ ■ मंगळवार दि.२५ मार्च २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 186 ■ Tuesday Dt. 25 March 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

## मालकाचे पैसे लुटल्याचा बनाव करणारा पोलिसांच्या ताब्यात

**बीड । प्रतिनिधी**

दिंद्रुड पोलीस ठाणे हद्दीत दिनांक ११/०३/२०२५ रोजी ०२.०२ वा. सैहीमुद्दीने फैमुद्दीन शेख वय २४ व्यवसाय ड्रायव्हर रा. माजलगाव हा दि.१०/०३/२०२५ ते ६ वा. सुमारास तेलगांव रोडवर कारी फाटयाजवळ त्याचे ताब्यातील अशोक लेलँड दोस्त वाहन कळंब येथुन केज, धारुर, तेलगाव मार्गे माजलगावकडे येत असतांना कारी फाटयाजवळ आल्यावर यातील अनोळखी तिघेजन स्पेंडर गाडीवर मागुन येवुन फिर्यादीस शिवीगाळ करु लागले फिर्यादीस काहीतरी झाले असेल असे वाटल्याने गाडी रस्त्याचे बाजुला घेवुन थांबवली असता तिन इसमांनी फिर्यादीस शिवीगाळ करुन डोळयात चटणी टाकुन मारहाण करुन गाडीमधील १,३५,८००/- रु रोख रक्कम जबरीने चोरुन नेले असल्याची तक्रार पोलीस स्टेशन ला फिर्यादीने दिली. वरील नमुद गंभीर गुन्हयाचे अनुषंगाने पो.नि. स्था.गु.शा.उस्मान शेख यांनी त्यांचे पथकास गुन्हा उकल करण्यासाठी सपोनि विजयसिंग जोनवाल व पोउपनि महेश विघ्ने यांना आदेश दिले. पोउपनि महेश विघ्ने यांनी आपल्या पथकासह दि.२२/०३/२०२५ रोजी गुन्हयातील आरोपीचा शोध घेण्यास सुरुवात केली असता गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, सदरचा प्रकार हा इसम नामे रहिम चाँद शेख रा. फुलेनगर माजलगाव याने केला आहे. त्यावरुन त्यास माजलगाव येथुन ताब्यात घेवुन गुन्हा अनुषंगाने बारकाईने विचारपुस केली असता त्याचे सांगितले की, सदर गुन्हयातील फिर्यादी सहमुद्दीन फहमुद्दीन शेख रा. फुलेनगर याने त्यास इंस्टाग्राम वरुन कॉल करुन त्याच्या मुलीची तब्यीयत खराब आहे तिच्या उपचारासाठी पैशाची गरज आहे तो मालकाचे कुलरची डिलीव्हरी देवुन कुलरचे पैसे घेवुन येणार आहे तु कारी फाटयाजवळ पाच ते सहा वाजता थांब आणी कांही इसम मला मारहाण करुन माझे डोळयात मिर्ची पावडर टाकुन माझे कडील पैसे घेवुन गेले असे त्याचे मालकाला सांगतो. असा प्लान करुन कारी फाटयाजवळ दोघांनी येवुन सहमुद्दीने शेख याने त्याचे जवळील नगदी १,३५,८००/- रु रहिम चाँद शेख यास दिले आहे. त्यानंतर पो.स्टे.दिंद्रुड येथे गुन्हा नोंद केला आहे.
सदरचा गुन्हा फिर्यादीनेच त्याचे मालकाचे कुलरचे विक्रीचे पैसे स्वःचे फायद्यासाठी चोरण्याचा बनाव करुन आरोपी रहिम चाँद शेख वय २६ वर्षे रा.फुलेनगर माजलगाव यांचे मतदीने गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले झालेने आरोपी रहिम शेख यास ताब्यात घेवुन त्याचे ताब्यातुन १,३५,८००/- रु नगदी जप्त करुन पुढील कार्यवाहीसाठी पो.स्टे.दिंद्रुड यांचे ताब्यात देण्यात आले आले असुन पुढील तपास पो.स्टे.दिंद्रुड हे करीत आहेत.

# बीडचे जिल्हा शल्य चिकित्सक अशोक थोरात यांचा राजकीय बळी!

- ■ आ.नमिता मुंदडा यांनी विधानसभेत डॉ.थोरात यांच्या निलंबनाची मागणी केली होती
- ■ लक्षवेधी डॉ.अशोक थोरात यांच्या जीवावर उठली; थेट झाली निलंबनाची कारवाई
- ■ राजकीय व मराठा-वंजारी वादामध्ये डॉ. थोरात यांचा बळी गेल्याची नागरिकांमध्ये चर्चा?
- ■ सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण आणि जातीय द्वेष बीड जिल्ह्याला लागलेला शाप?

**बीड । प्रतिनिधी**

बीडचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अशोक थोरात यांनी कोरोनाच्या काळामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केला आहे. डॉ. थोरात यांना निलंबित केले जावे, अशी मागणी भाजपच्या आमदार नमिता मुंदडा यांनी विधानसभेत केली. त्यानंतर राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी अशोक थोरात यांना निलंबित केले जाणार असल्याची घोषणा केली. विधानसभेत आमदार मुंदडा यांनी लक्षवेधी मांडत म्हटले की, बीडचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अशोक थोरात यांनी कोरोना काळात प्रचंड भ्रष्टाचार केला. कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार बीडमध्ये झाला. भ्रष्टाचार झाल्यानंतर त्यांची चौकशी झाली. चौकशीत ते दोषी सापडले. दोषी सापडल्यानंतर त्यांची बदली नाशिकला केली. तिथे त्यांनी काय केले हे माहीत नाही. पण परत जिथे भ्रष्टाचार झाला तिथे बीडमध्ये त्यांची सिव्हिल सर्जन म्हणून बदली करण्यात आली. हे बरोबर आहे का? जिथे इतका मोठा प्रचंड भ्रष्टाचार झाला, त्यांना पुन्हा इकडे परत कसे आणले गेले, या व्यक्तीवर तुम्ही गुन्हा दाखल करणार का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

यावर आरोग्यमंत्री आबिटकर म्हणाले की, बीड जिल्ह्याचे सिव्हिल सर्जन आणि त्यांच्या कामकाजाबद्दल खूप गंभीर आक्षेप आहेत. निश्चितपणाने सिव्हिल सर्जन थोरात यांना आपण निलंबित करत आहोत. त्यांना निलंबित करून तीन महिन्यांच्या कालावधीत चौकशी पूर्ण करण्यात येईल. यात जे दोषी आढळतील, त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

**परंतु इतर ११ जणांबाबत काही घोषणा का नाही?**

कोरोनाकाळात डॉ. अशोक थोरात यांचे काम चांगले होते. त्यानंतर त्यांची नाशिक येथे बदली झाली. त्यानंतर डॉ. सुरेश साबळे, डॉ.सूर्यकांत गीते आदींनी सीएस म्हणून कारभार घेतला याच काळात अनियमितता झाली त्याची चौकशी करण्यात आली यामध्ये डॉ. थोरात यांच्यासह डॉ.साबळे डॉ.गीते आणि इतर नऊ जणांचा समावेश होता. या अनुषंगाने आमदार मुंदडा यांनी प्रश्न उपस्थित केला. त्यानुसार मंत्री आबीटकर यांनी थोरात जनिलंबन करत असल्याचे सांगितले. परंतु इतर ११ जणाबाबत त्यांनी काहीही घोषणा केली नाही. डॉ. थोरात यांच्या निलंबनाची बातमी समजतात हा अतिशय चुकीचा निर्णय आहे अशा प्रतिक्रिया सामान्य मध्ये उमटल्या आहेत.

अर्धमेलेल्या जीवाने पाणी मागितले तर हे राक्षस त्यांच्या तोंडात मुतले, वेदना असह्य झाल्याने डोळ्यातून आश्रु आले तर या हैवानानी डोळे जाळले, अवघड जागेच्या ठिकाणी पण मोठे आघात म्हणून केले, शरीरावर एक जागा शिल्लक नव्हती तिथे रक्त साखळले नव्हते. यांचा उद्देश फक्त हत्या करण्याचा नव्हता तर दहशत निर्माण करायची होती.
हा प्रसंग स्व.संतोष देशमुख यांच्या सोबत घडला त्याचे पोस्टमार्टम चे फोटो बाहेर काढून महाराष्ट्रा समोर आणणाऱ्या डॉ.अशोक थोरात यांना स्थानिक भाजपा आमदारांनी विधानसभेत लक्षवेधी करून निलंबित केले आहे.निलंबित का केले आहे तर आमदार यांनी त्यांना किंवा त्यांच्या वरिष्ठ नेत्यांना त्यांच्या राजकीय जीवनात सहकार्य केले नाही म्हणून, कोविड काळात १२ अधिकारी आणि ३ सिव्हिल सर्जन यांची चौकशी चालू असताना सत्तेचा गैरवापर करून एकाच सिव्हिल सर्जन ची चौकशी करून त्यांच तडकाफडकी निलंबन करणे कितपत योग्य आहे? याच उत्तर आमदार महोदया देतील का?

### ...तर यावर आमदार महोदया विधानसभेत आवाज उठवणार का?

तत्कालीन जिल्हाधिकारी राहुल रेखावार व राधा विनोद शर्मा आणि रवींद्र जगताप यांच्या कार्यकाळात पूर्वीच्या एकूण झालेल्या प्रशासकीय मान्यतांची व खरेदीची चौकशी चौकशी होणे देखील गरजेचे आहे. यावर आमदार महोदय, विधानसभेत आवाज उठवणार का हे देखील पाहाणं तितकेच महत्त्वाचे ठरणार आहे. २४६ कोटी रुपयांच्या विविध घोटाळ्याची आता तरी सखोल चौकशी होईल का? अन्य सिविल सर्जन अतिरिक्त सिविल सर्जन औषध भांडार प्रमुख यांची सखोल चौकशी होणार का यावर कोणी आवाज उठवणार का? असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. तसेच राजकीय वातावरणामध्ये डॉ. अशोक थोरात यांचा मराठा व वंजारी वादामध्ये बळी गेल्याची चर्चा नागरिकांमध्ये ऐकायला मिळत आहे. आणि कोविड साहित्य खरेदीमध्ये खोटे बिल काढणारा सिविल सर्जनची तपासणी करणे गरजेचे आहे. ३०४ कोटीच्या प्रशासकीय मान्यतांची व त्या खरेदीचे सखोल चौकशी होणे गरजेचे आहे. यावर आमदार महोदया विधानसभेत आवाज उठवणार का? झालेला घोटाळा आमदार महोदयांनी बाहेर काढावा अशी देखील मागणी होत आहे.



# वीरशैव लिंगायत वाणी स्मशानभूमीतील समाधीची विटंबना

- ■ विटंबना करणाऱ्या अज्ञात व्यक्तीवर कारवाई करण्यासाठी समाज बांधव आक्रमक
- ■ आ.विजयसिंह पंडितांसह तहसीलदार, उपविभागीय पोलीस अधिकारी आणि पोलीस स्टेशनला दिले निवेदन



**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई शहरातील गोविंदवाडी रोड लगत वीरशैव लिंगायत वाणी समाजाची स्मशानभूमी असून या स्माशनभुमीमध्ये असलेल्या एका समाधीस्थळाची विंटबना झाल्याची घटना घडली आहे. या स्मशानभुमीमध्ये कै. सिध्दलींगअप्पा कोंडाअप्पा बेदरकर यांच्या समाधीची अज्ञात व्यक्ती कडुन नासधुस करून समाधी ची विटंबना करण्यात आली आहे.
या घटनेच्या अनुषंगाने आज गेवराई शहरातील वीरशैव लिंगायत वाणी समाज बांधवांनी एकत्र येऊन अज्ञात व्यक्ती विरुद्ध योग्य ती कार्यवाही करण्यासाठी व वीरशैव लिंगायत वाणी समाजाच्या स्मशानभुमी मधील समाधीसाठी सरंक्षण देण्यात यावे अशा आशयाचे निवेदन आज दि. २४ वार सोमवार रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी गेवराई, पोलीस निरीक्षक गेवराई पोलीस स्टेशन,मुख्याधिकारी तथा प्रशासक नगर परिषद गेवराई तसेच गेवराई तालुक्याचे आमदार विजयसिंह पंडीत यांना निवेदन देण्यात आले. यावेळी संबंधित व्यक्तीवर तात्काळ कारवाई करण्यात यावी तसेच स्मशानभूमीला संरक्षण देण्यात यावे अशा प्रकारची मागणी यावेळी वीरशैव बांधवांच्या वतीने करण्यात आली. याप्रसंगी गणेशअप्पा कापसे, अनिलअप्पा शेटे, वैजिनाथअप्पा मिटकर, शाम रुकर, सुनील संभाहारे, योगेश कापसे, सुरेंद्र रुकर, रविशंकर वाडकर, दिपक कापसे,प्रवीण राजुरे, नंदकिशोर कापसे, अशोक फुलशंकर, अनिल सोरे, अमोल संभाहारे यांच्यासह गेवराई येथील सर्व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.